**प्रसिध्दी पत्रक** दिनांक 07/07/2026

**आरोपी खाजगी इसम** अमोल श्रीरंग बडक ,(मंडळ अधिकारी खाजगी मदतनीस) (खाजगी इसम) 2) सचिन काशिनाथ बडक (खाजगी इसम) यांनी तक्रारदार यांचेकडुन 10,000/- लाचेची मागणी करुन फोनपे व्दारे लाच स्विकारल्याने आरोपी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे सिल्लोड (शहर), छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | श्री. अमोल श्रीरंग बडक , वय 28 वर्ष, व्यवसाय -शेती , (मंडळ अधिकारी खाजगी मदतनीस) मु. चिचपुर. पोस्ट मंगरूळ ता. सिल्लोड,जि. छत्रपती संभाजीनगर.<br>2) सचिन काशिनाथ बडक , वय 29 वर्ष , मु. चिंचपूर, पोस्ट, मंगरूळ ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | 20,000/- तडजोडी अंती 10,000/- |
| लाच स्विकृती रक्कम | 10,000/- अरोपी क्र.2 यांचे फोनपे व्दारे. |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री.भास्कर नवले, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्री धर्मराज बांगर, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या शेतजमीचा तलाठी यांनी मंजुरी करीता पाटविलेला फेर मंजुर करण्या करीता. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी दिनांक 20/ 11/ 2025 रोजी मौजे चिंचपूर येथे गट क्रमांक 123 मध्ये दोन गुंटे जमीन खरेदीखता व्दारे खरेदी केली होती. सदर जमिनीचा फेर तलाठी सजा कार्यालय पालोद यांचे मंडळ अधिकारी यांच्या कडे प्रलंबित असल्या कारणाने तक्रारदार यांनी खाजगी इसम (मंडळ अधिकारी मदतनीस ) यांना फेर विषयी विचारणा केली. त्यावेळी त्यांनी सांगितले की मंडळ अधिकारी पालोद यांनी तुमचा फेर नामंजूर केलेला आहे. तो फेर मंजूर करण्यासाठी मंडळ अधिकारी पालोद यांना 20,000/ हजार रुपये द्यावे लागतील असे सांगुण लाचेची मागणी केली. तरी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक 06/07/2026 रोजीं लाचलुचपत प्रतिबंध विभाग छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार दिली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 07/07/2026 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली. त्यावेळी यातील खाजगी इसम आरोपी क्र.1 अमोल बडक यांनी तक्रारदार यांच्या जमिनीचा फेर मंडळ अधिकारी पालोद यांचेकडून मंजूर करून घेण्यासाठी 20,000/ - हजार रुपयांची लाच मागणी आरोपी क्र. 2 याचे व पंचा समक्ष करुन तडजोडी अंती 10,000/- रुपये स्वीकारण्याचे मान्य केले. त्यानंतर लाचेची रक्कम आरोपी क्र. 2 सचिन बडक यांच्या फोन पे वर स्वीकारली. त्यावेळी दोन्ही आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले.<br>दोन्ही आरोपी यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन सिल्लोड शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक, श्री.भास्कर नवले यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पो.ह, नागरगोजे,पो.अंम.प्रकाश डोंगरदिवे, पो.अंम.चांगदेव बागुल, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205
पोलीस उप अधीक्षक :- 9870145915 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

**(प्रशांत पवार)**
**पोलीस उप अधीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**छत्रपती संभाजीनगर**